दै. गोदातीर दि. २९/०९/२०२२

# सव्वा दोन लाखांच्या मुद्देमालासह आरोपीस काही तासातच अटक; वजिराबाद डी. बी. पथकाची कारवाई



**नांदेड-** वजिराबाद पोलीस स्टेशन हद्दीतील चोरी प्रकरणातील आरोपीला काही तासातच अटक करून त्याच्याकडून सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई वजिराबाद पोलीस स्टेशनच्या डी. बी. पथकाने केली आहे.

पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, निलेश मोरे, पोलीस उपाधिक्षक चंद्रसेन देशमुख यांनी नांदेड जिल्ह्यातील चोरी व घरफोडी गुन्हेगारीस आळा घालण्याचे उद्देशाने आरोपीविरुध्द कडक प्रतिबंधक कारवाया व चोरी गुन्हे उघडकीस आणने बाबत आदेशीत केले होते. या आदेशाप्रमाणे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांनी पोलीस ठाणे वजिराबाद हद्दीत वरीलप्रमाणे कारवाया करण्याच्या सुचना गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिल्या होत्या. सदर सुचनांप्रमाणे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय डी. निलपत्रेवार, पोना गजानन किडे, मनोज परदेशी, शरदचंद्र चावरे, विजयकुमार नंदे, पोकॉ. संतोष बेलुरोड, शेख ईम्रान, रमेश सूर्यवंशी, व्यंकट गंगुलवार, बालाजी कदम, सचिन वालेकर या पथकाने दि. २७ सप्टेंबर रोजी गुप्त माहिती मिळाल्यानुसार आरोपी मनोज शंकरराव पंतगे रा. जुना मोंढा नांदेड यास ताब्यात घेऊन अधिक विचारपूस केली असता त्याने दि. २६ सप्टेंबर रोजी रात्रीला कालेजी टेकडी येथून दोन साथीदारसह एक लाल रंगाचा अॅपे ऑटो, पासिंग क्रमांक MH26 BD 2933 असा असलेला किंमती दोन लाख ३० हजार रुपये चोरी केल्याचे कबूल केले. आरोपीचे ईतर दोन साथीदार त्यांचा शोध घेत आहेत. सदर ऑटोच्या चोरीबाबत पोलीस ठाणे वजिराबाद नांदेड गुरनं. ३४०/२०२२ कलम ३७९ भादंवीप्रमाणे गुन्हा दाखल असून, पुढील गुन्ह्याचा तपास पोहेकॉ संतोष राठोड हे करीत आहेत.

दै. गोदातीर दि. २९/०९/२०२२

# मधुर मॉर्निंग नावाच्या मटका जुगारावर पोलिसांची कारवाई; आठ जणांना अटक

**नांदेड-** शहराच्या मुदखेड ते वाजेगाव पोलीस चौकीजवळ सुरू असलेल्या बेकायदेशीररित्या मधुर मॉर्निंग नावाच्या मटका जुगार अड्ड्यावर नांदेड ग्रामीण पोलिसांनी कारवाई केली. यावेळी आठ जणांना अटक करून अड्ड्यावरून साडेचार हजार रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले. ही कारवाई २७ सप्टेंबर रोजी दुपारी दीडच्या सुमारास करण्यात आली.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाजेगाव परिसरात पोलीस चौकीच्या बाजूला बालाजी पाटील यांच्या कॉम्प्लेक्सजवळ असलेल्या मोकळ्या मैदानात दि. २७ सप्टेंबर रोजी दुपारी मधुर मॉर्निंग नावाचा मटका सुरू असल्याची माहिती पोलीस अंमलदार विश्वनाथ पवार यांना मिळाली. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत त्या ठिकाणी कारवाई केली असता विनापरवाना बेकायदेशीररित्या आठ जुगारी मटका नावाचा जुगार खेळत व खेळवीत असताना मिळून आले. पोलिसांनी शेख तुराब शेख महंमद (वय २२) राहणार एकबालनगर, वाजेगाव, शेख रिजवान शेख रब्बानी (वय ३२) राहणार बिलालनगर वाजेगाव, सय्यद मुसा सय्यद साब (वय ३२) रा. जिल्हा परिषद शाळे-जवळ वाजेगाव, सय्यद शादुल सय्यद युसूफ (वय ३२) राहणार बिलालनगर मस्जिद जवळ वाजेगाव, अमजद खान मसूद खान (वय ३२) बिलालनगर वाजेगाव, शेख मुबीन शेख मोईन (वय ४०) राहणार पानसरेनगर नायगाव आणि शेख सलीम शेख हमीद (वय ३१) राहणार जामा मशीदजवळ वाजेगाव यांना अटक केली. डावावरून पोलिसांनी साडेचार हजार रुपये रोख व जुगाराचे साहित्य जप्त केले. पोलीस अंमलदार विश्वनाथ पवार यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे कलम १२ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक कदम करत आहेत.